:: **<u>प्रेस नोट</u>** :: दिनांक :- २६/०५/२०२६

**लोन ॲप वरुन धमकी देवून खंडणी उकळणाऱ्या टोळीला गुन्हे शाखेने केली अटक.**

दिनांक २५/०५/२०२५ रोजी फिर्यादी यांनी एकाच ऑनलाईन लोन ॲपवरून २२,०५० / रूपयांचे लोन घेतले होते. त्यावेळी त्यांना देण्यात आलेल्या एपीके फाईलव्दारे फिर्यादीचे मोबाईलमधील काही डेटाचा एक्सेस आरोपींनी प्राप्त केला होता. सदरचे लोन त्यांनी व्याजासह परतफेड केल्यानंतर ही लोन संदर्भात त्यांना व त्यांचे नातेवाईकांना फोन येण्यास सुरूवात झाली होती. त्यामध्ये धमकी तसेच त्यांचे नातेवाईकांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी फोन करून बदनामी करणे अशा रितीने मानसिक त्रास देण्यास सुरवात केली होती. तसेच अशा प्रकारचे फोन करायचे नसतील व कुटुंबीयांची सुरक्षितता पाहीजे असल्यास आम्ही सांगु त्या ॲपवरून परत लोन घेवून आमचे व्याजाची परत फेड करा अशी धमकी व भिती घालून फिर्यादी यांना विविध १८ ऑनलाईन लोन ॲप वरुन ७,०५,५७०/रूपये अद्यापपर्यंत लोन घेण्यास भाग पाडले.

फिर्यादी यांनी सदरच्या रकमेवरील व्याजासह लोन परतफेड केली असतांना देखील आणखी फोन व मेसेज चालूच होते व फिर्यादीला घेतलेले लोन वन टाईम सेटल करायचे असल्यास आणखी रक्कमेची मागणी केली होती. सदरचे ऑनलाईन ॲप वरुन घेतलेल्या लोनच्या अनुषंगाने फिर्यादी, त्यांचे नातेवाईक, मित्र, त्यांच्या कार्यालयातील अधिकारी यांना वेळोवेळी मेसेज व फोन करून फिर्यादी यांची बदनामी केली. सदरच्या वारंवार येणारे फोन कॉल्स, मेसेज व नातेवाईक सहकारी यांच्याकडे होणारी नाहक बदनामीला वैतागुन फिर्यादी यांची मानसिक स्थिती खालावली होती.

सदरबाबत फिर्यादी यांचे प्राप्त तक्रारी वरुन दिनांक २५/०५/२०२६ रोजी गुन्हे शाखेने सापळा रचून फिर्यादीकडून खंडणीच्या स्वरूपात रक्कम घेण्यासाठी आलेले सहा आरोपी शिताफिने ताब्यात घेण्यात आले असून त्यांचे मुख्य सुत्रधाराबाबत तपास चालू आहे. फिर्यादी प्रमाणे आणखी बऱ्याच पिडीतांना ऑनलाईन लोन ॲपच्या माध्यमातुन मानसिक छळ करून खंडणीच्या स्वरूपात सदरच्या टोळीने रकमा उकळल्या असल्याची शक्यता आहे. सदर गुन्हयात एकुण सहा आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना मा. न्यायालयाने दिनांक ३०/०५/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुरी केली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण, श्री. दिनकर शिलवटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दिलीप तेजनकर, पोलीस निरीक्षक प्रशांत गावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश शेलार, पोलीस उप निरीक्षक जयेश कुलकर्णी, रामेश्वर घाटोळ, नितीन भोसले (कक्ष-४), विजय भेंडाळे (कक्ष-५), अंकुश न्यायनिर्गूणे (कक्ष-५), स.फौ. मंगेश सावंत, पो.ह.राणे, परब, पाडवी, बोरसे, थिटमे, डेरे, हरड, पो.शि. आव्हाड, शिंदे, कळसाने, तसेच पो.ह. मोटे (कक्ष-४), लोहकरे(कक्ष-५), काळे (कक्ष-५), पो.शि. शिंदे (कक्ष-४) यांनी केलेली आहे.

---ooo---